# प्रेस नोट ता.०४/०७/२०२०

## पिस्टल व दोन काडतुसासह सराईत गुन्हेगारास भोसरी येथुन अटक

### गुन्हे शाखा, युनिट १, पिंपरी चिंचवडची कारवाई,

दि.०३/०७/२०२० रोजी गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे आदेशानुसार सहायक पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक कळुराम लांडगे, पोलीस कर्मचारी काळु कोकाटे, सचिन उगले, गणेश सावंत, विजय मोरे असे भोसरी भोसरी स्टेशन हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना **पोलीस शिपाई गणेश सावंत** यांना माहिती मिळाली की, भोसरी येथील दिघी रोड फाटा येथील पुलाखाली एक इसम थांबला असुन त्याने अंगावर चॉकलेटी रंगाचा शर्ट व खाकी रंगाची पॅन्ट घातलेली आहे. वगैरे मजकुरची माहिती मिळताच वपोनि उत्तम तांगडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे वरील स्टाफसह भोसरी ब्रीजखालील परीसरामध्ये सापळा लावुन थांबले असता बातमीतील वर्णनाचा एक इसम हा भोसरी ब्रीज खाली, दिघीकडे जाणाऱ्या रोडवर थांबलेला दिसला तेव्हा त्यास पकडणे कामी जात असताना त्यास पोलीसांची चाहुल लागल्याने तो पळुन जावुन लागला त्याचा पाठलाग करून त्यास मोठ्या शिताफीने पकडले. तेव्हा सदर इसमाचे नाव **भानुदास दत्तात्रय शेलार, वय ३२ वर्षे, रा.मु.पो. चिंबळी, ता.खेड, जि.पुणे** असे असल्याचे समजले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजुस खोचलेले **एक देशी बनावटीचे पिस्तोल व त्यामध्ये दोन जिवंत काडतुसे** मिळुन आले. त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरूध्द बेकायदेशीर रित्या शस्त्र जवळ बाळगले प्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियमान्वये भोसरी पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी याने सुमारे दोन वर्षापुर्वी त्याचे साथीदार १) प्रशांत तोतरे, २) राहुल कांडगे व इतर साथीदारांच्या मदतीने चाकण येथे राहणारा बंडु काळे यास पैसे देणे घेण्याच्या कारणावरूनमारहाण करून गंभीर दुखापत केली होती त्याबाबत चाकण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असुन त्यामध्ये आरोपी यास अटक झालेली आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहायक पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पाउेनि काळुराम लांडगे तसेच पोलीस कर्मचारी बाळु कोकाटे, सचिन उगले, विजय मोरे, गणेश सावंत यांनी केली आहे.

पुढील अधिक तपास गुन्हे शाखा, युनिट १ कडील पो.हवा.बाळु कोकाटे हे करीत आहेत.